**राम नाईक**
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फैक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com


**कृपया प्रसिध्दीसाठी -** **17 ऑक्टोबर 2008**

**भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी मुंबई येथे 17 ऑक्टोबर 2008 रोजी पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन**

---

***पेट्रोलियम क्षेत्रातील अराजकता थांबवून***
***डिझेल, पेट्रोल आणि गॅस चे दर कमी करा : राम नाईक***

**मुंबई, शुक्रवार** : "गेल्या 16 वर्षांत सप्टेंबर महिन्यात सर्वात जास्त वाढलेली महागाई, त्याचबरोबर देशात आलेली आर्थिक मंदी यांना पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांचे कॉंग्रेस आघाडीचे सरकारच जबाबदार आहे. त्यातच पेट्रोलियम क्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या अराजकतेमुळे सामान्य माणसाला जीवन जगणे असह्य झाले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर निम्म्याने कमी झाल्यामुळे आता महागाई कमी करण्यासाठी डिझेल, पेट्रोल आणि स्वयंपाकाचा गॅस यांची जून 2008 मध्ये करण्यात आलेली दरवाढ मागे घेण्यात यावी," अशी मागणी माजी पेट्रोलियम मंत्री आणि भाजपा नेते श्री.राम नाईक यांनी शुक्रवारी मुंबई येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केली.

यासंबंधी सविस्तर बोलताना श्री.राम नाईक म्हणाले, "गेल्या चार वर्षांत पेट्रोलियम क्षेत्रात अक्षरशः अराजक माजले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात जुलै 2008 मध्ये कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरेल 147 डॉलर्स होती. त्यावेळी आंतरराष्ट्रीय बाजारात सतत वाढत्या किंमतींमुळे आधीच कॉंग्रेस सरकारने पेट्रोलची किंमत रु.5.00 प्रतिलिटर, डिझेल रु.3.00 प्रतिलिटर आणि स्वयंपाकाचा गॅस रु.50.00 प्रति सिलेंडर वाढविली. मात्र आता या आठवड्यात आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरेल 72 डॉलर्सपर्यंत खाली आली असूनही त्या प्रमाणात पेट्रोल, डिझेल आणि गॅस यांचे दर सरकारने कमी केलेले नाहीत. या सरकारला सामान्य माणसाच्या अडीअडचणींची जाणीवच नसल्यामुळे वाढविलेले दर अजून मागे घेतलेले नाहीत. परंतु 31 ऑगस्ट रोजी विमानांसाठी वापरण्यात येणा-या इंधनाचा (एव्हिएशन टर्बाइन फ्युएल) दर प्रतिलिटर 11.78 रुपयांनी, तर आणखी 1 ऑक्टोबरपासून प्रतिलिटर 3.20 रुपयांनी, म्हणजेच एकूण 15 रुपयांनी कमी करण्यात आला. सामान्य माणसाला लागणा-या डिझेल - गॅसचे दर कमी होत नाहीत, परंतु श्रीमंतांसाठी लागणा-या विमानाच्या इंधनाचे दर कमी होत आहेत, हे धक्कादायक आहे." असेही श्री.नाईक म्हणाले.

## इथेनॉल उत्पादनावर कुठोराघात

"गेल्या चार वर्षात पेट्रोलियम क्षेत्रासाठी कोणतेही निश्चित धोरण श्री.मनमोहन सिंह सरकारने स्विकारलेच नाही, त्यामुळेच पर्यायी इंधन म्हणून इथेनॉलचा विकास करण्याचे पंतप्रधान वाजपेयी यांच्या काळात स्विकारलेले धोरण पेट्रोलियम मंत्री श्री.मुरली देवरा यांनी अक्षरशः रुळावरुन खाली उतरविले आहे. ऊसाच्या मळीपासून इथेनॉल बनविण्याचा क्रांतीकारक कार्यक्रम वाजपेयी सरकारने अंमलात आणण्यास सुरुवात केली होती. इथेनॉलमुळे कच्च्या तेलाची आयात कमी होऊन परकीय चलन वाचणार होते. इतकेच नव्हे तर त्यामुळे ऊस उत्पादक शेतक-यांना त्यांच्या ऊसाला चांगला भाव मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन मिळणार होते. त्याचबरोबर इथेनॉल हे पर्यावरणाच्या दृष्टीनेही लाभदायक आहे. वाजपेयी सरकारने 2003 मध्ये ऊस उत्पादन करणा-या 9 राज्यांमध्ये पेट्रोलमध्ये 5 टक्के इथेनॉल मिसळण्याचे बंधनकारक केले होते. 2004 साली उरलेल्या राज्यांमध्ये 5 टक्के, तर 2005 मध्ये संपूर्ण देशात 10 टक्के इथेनॉल मिसळण्याचा निर्णय झाला होता.

..2..

राम नाईक
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फैक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com



मात्र देशहिताचा हा निर्णय अंमलात न आणता लिकर लॉबीच्या दबावाला बळी पडून पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांच्या सरकारने 2004 पासून इथेनॉल खरेदी करणेच बंद केले. आता पुन्हा इथेनॉल खरेदीला सुरुवात करणार असल्याचे सूतोवाच गेल्या आठवड्यातच पेट्रोलियम मंत्रालयाच्या सूत्रांनी केले. तात्पर्य महत्त्वाची चार वर्षे वाया गेली. केंद्र सरकारमध्ये महाराष्ट्रातून श्री.शरद पवार कृषि मंत्री आणि श्री.मुरली देवरा पेट्रोलियम मंत्री असतांना हे असे घडावे, हे दुर्दैवाचेच आहे," अशी प्रतिक्रियाही श्री.नाईक यांनी व्यक्त केली.

**स्वयंपाकाच्या गॅसचा आणि केरोसीनचा काळाबाजार**

वाजपेयी सरकारच्या काळात स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरची 1 कोटी 10 लाख ग्राहकांची प्रतिक्षा सूची संपवून सुमारे 4 कोटी ग्राहकांना नव्या जोडण्या देण्यात आल्या होत्या. ज्यांना दोन सिलेंडर पाहिजे होते, त्यांना 2 सिलेंडरही देण्यात येऊन मागेल त्याला गॅस मिळेल अशी परिस्थिती निर्माण करण्यात आली होती. मात्र गेल्या काही महिन्यात पुन्हा लाखो ग्राहक नव्या गॅस जोडणीसाठी प्रतिक्षा सूचीवर आहेत. 19 ऑगस्ट 2008 रोजी दिल्ली येथे झालेल्या बैठकीत त्यावेळी असलेल्या 8 लाख ग्राहकांची प्रतिक्षा सूची 60 दिवसात संपविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु त्याचीही अंमलबजावणी झालेली नाही. इतकेच नव्हे तर संपलेल्या सिलेंडर ऐवजी दुसरा सिलेंडर मिळण्यासही 21 दिवसांपेक्षा अधिक काळ लागत आहे. त्यामुळे कृत्रिम तुडवडा निर्माण होत असून काळाबाजार आणि भ्रष्टाचार फोफावला आहे. जर ग्राहकांनी विक्रेत्यांकडून स्वतः सिलेंडर नेला, तर त्यापोटी रु.8.00 सूट (रिबेट) देण्याचा नियम होता. ती सवलत देखील मुंबई, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नई या चार महानगरांतून रद्द करण्यात आली आहे. या महानगरांत सर्वांनाच घरपोच सिलेंडर दिले जात नाहीत ते वेगळेच, अशी धक्कादायक माहितीही श्री.नाईक यांनी दिली. या शिवाय शिधावाटप पत्रिकेवर पूर्वीप्रमाणे केरोसीन मिळत नसून त्याचाही काळाबाजार उघडपणे चालू असल्याचे त्यांनी सांगितले.

**मुंबईत पाइप गॅस जोडण्या बंद**

मुंबईमध्ये महानगर गॅस लिमिटेडच्या माध्यमातून पाईपद्वारे घरगुती नैसर्गिक गॅस (पीएनजी) देण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम श्री. राम नाईक पेट्रोलियम मंत्री असताना हाती घेण्यात आला होता. त्या कार्यक्रमांतर्गत आजपर्यंत 3.59 लाख कुटुंबांना पाईपव्दारे गॅस देण्यात आला, तर 1.87 लाख ऑटोरिक्षा, टॅक्सी आदि वाहनांना सीएनजी गॅस पुरविण्यात येतो. पाईप गॅस हा सिलेंडरमधील एलपीजी गॅसपेक्षा खूपच स्वस्त आहे, तर ऑटोरिक्षा-टॅक्सीचालकांना मिळणारा सीएनजी गॅस हा पेट्रोलपेक्षा 75 टक्क्यांनी स्वस्त आहे. गेल्या 6 महिन्यांपासून घरगुती वापराच्या जोडणीकरीतां पाईप गॅस देणे देखिल सरकारने बंद केले आहे, अशी माहिती श्री.नाईक यांनी दिली.

"पेट्रोलियम क्षेत्राच्या अन्य विविध आघाड्यांवरही गलथानपणा आणि अकार्यक्षमता यांची बजबजपूरी माजली असून अराजकता निर्माण झाली आहे ती थांबवा, पेट्रोल चे दर प्रति लिटर रु.5.00, डिझेल प्रति लीटर रु.3.00 आणि गॅस रु.50 प्रति सिलेंडर कमी करा नाहीं तर जनता आगामी काळात काँग्रेसला धडा शिकविल्या-शिवाय राहणार नाही," असेही श्री.राम नाईक शेवटी म्हणाले.

(कार्यालय सचिव)